**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
**416 004, MAHARASHTRA**
PHONE:EPABX–2609000,www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र**
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ - २६०९०९१, २६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि/संलग्नता टी-२/KOP/२०२४-२५/No - 1708 दि. 29 JUL 2024

प्रति,

| | |
|---|---|
| १. प्राचार्य डॉ. एम. के. पाटील (अध्यक्ष)<br>पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,<br>कवठेमहांकाळ, जि.सांगली.<br>फोन नं. - ०२३४१-२९५२२०<br>मो.नं. - ९४२११८५२७७ | २. प्राचार्य डॉ. अमित सवदी (सदस्य)<br>नारायणदास सर्वोत्तमदास सोटी विधी महाविद्यालय,<br>सांगली.<br>फोन नं. - ०२३३-२३७२१८२<br>मो. नं. - ९८९०१५२१३१/९४०४३६९९९३ |

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील खालील प्रस्तावासंदर्भात नियुक्त स्थानिक चौकशी समितीबाबत.

संदर्भ :- शासन आदेश क्र. HTED-२९०६६(११)/१२/२०२४/८११२१२-MHT-(HE-४) दि.१५/०७/२०२४.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून खाली नमूद केलेल्या महाविद्यालयाच्या नांवासमोर उल्लेखीत प्रस्तावासंदर्भात चौकशी करून तत्सम अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० नुसार उपरोक्त प्रमाणे स्थानिक चौकशी समिती गठित करण्यात आली.

| महाविद्यालयाचे / संस्थेचे नाव | संलग्नीकरण प्रकार | प्रस्ताव प्रकार/पाठ्यक्रम |
|---|---|---|
| शाहू शिक्षण संस्था, पंढरपूर, म्हाडा प्लॉट नं.२२, वसुंधरा कॉलेज, जुळे सोलापूर.<br>मो.नं. - ९९७०१२५५५५ / ९०४९२९४४७६ / ९५१८७२९५३६ | प्राथमिक संलग्नीकरण | नवीन विधी महाविद्यालय -<br>धर्मवीर संभाजी महाराज विधी महाविद्यालय, जत, ता.जत, जि.सांगली.<br>तीन वर्षीय विधी अभ्यासक्रम (६०)<br>पाच वर्षीय विधी अभ्यासक्रम (६०) |

सबब, विद्यार्थी प्रवेशाच्या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त महाविद्यालयास तात्काळ भेट द्यावी व समितीचा अहवाल त्याच दिनांकास अथवा शक्य तितक्या लवकर आपल्या प्रवासभत्ता-दैनिक भत्ता यांच्या देयकांसह विद्यापीठ कार्यालयास सादर करावा. या अंमलबजावणीवर पुढील कार्यवाही अवलंबून असल्याने समितीकडून तातडीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रस्तावास अनुसरुन करावयाच्या चौकशीच्या अनुषंगाने समिती सदस्यांनी कृपया खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. समितीने AICTE, DTE व महाराष्ट्र शासन यांच्या मान्यतेस अनुसरून संबंधित महाविद्यालय/अभ्यासक्रमाच्या शिफारशी कराव्यात.

२. **महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावास प्राथमिक संलग्नीकरण मंजूर व्हावे किंवा कसे याबाबतची आपली शिफारस सुस्पष्टपणे अहवालात नमूद करावी.** याकामी स्थानिक चौकशी समितीचा **नमुना "अ" व नमुना "क"** यांचा वापर करावा.

३. ज्या अटीवर संलग्नीकरणाची शिफारस करावयाची आहे, त्या सर्व अटी समितीने सुसूत्रपणे अहवालात नमूद कराव्यात. अटींचे स्वरुप मोघम असू नये. पुस्तके, जिमखाना साहित्य, इमारत इ. बाबत शिफारशी त्रुटी स्पष्ट शब्दांत नमूद कराव्यात.

४. विद्यापीठाच्या नमुन्यामध्ये समितीने कोणताही बदल अथवा कोणताही भाग वगळू नये. त्यामध्ये भेटीचा दिनांक, उपस्थित सदस्य, अभ्यासक्रम, विद्याशाखा, प्रवेश क्षमता समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबी/निरीक्षणे, महाविद्यालयात प्रत्यक्ष असलेल्या त्रुटी/ अटी, संलग्नीकरणाबाबत समितीची स्पष्ट शिफारस इ. चा उल्लेख असावा. त्यावर सर्व उपस्थित समिती सदस्यांची नावे व स्वाक्षरी असावी.

५. समितीने महाविद्यालयास भेट देताना अध्यक्षांनी स्वत: तात्काळ तारीख निश्चित करून ती महाविद्यालयास कळवावी. महाविद्यालयाच्या सोईची तारीख घेऊन भेट निश्चित करू नये.

६. **मा. अध्यक्षांसह समिती सदस्यांनी आपली T.A./D.A. ची बिले (अध्यक्षांच्या स्वाक्षरी) एकत्रित पाठवावीत. तसेच आपल्या बिलावर आपल्या बँकेचे नाव पत्ता व खाते क्रमांक IFSC Code न चुकता नमूद करावा.**

७. समितीस मोटार वाहन वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, सदस्यांनी वाहनाचा वापर एकत्रितपणे करण्याबाबत सतर्क रहावे. मा.सदस्यांनी बैठकीस उपस्थित राहण्यासाठी स्वत:चे वाहन वापरले असल्यास टोल द्यावा लागणा-या मार्गावरील प्रवासातील टोल नाक्यावरील पावत्या बिलासोबत सादर करणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेऊन समिती सदस्यांनी नियोजित तारखांना संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन अहवाल सत्वर विद्यापीठाकडे पाठवून सहकार्य करावे अशी पुन:श्च विनंती करण्यात येत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

**डॉ. पी. एस. पांडव**
**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-२ विभाग**

प्रत :- **१. मा.अध्यक्ष, शाहू शिक्षण संस्था, पंढरपूर, म्हाडा प्लॉट नं.२२, वसुंधरा कॉलेज, जुळे सोलापूर.**

- यांना विनंती करण्यात येते की, समितीने/अध्यक्षांनी निश्चित केलेल्या तारखेस स्वत: उपस्थित राहावे. तसेच महाविद्यालयातील सर्व संबंधिताना समितीच्या भेटीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत सूचना द्याव्यात व संबंधित अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक सोयी-सुविधांची कागदपत्रे समितीस उपलब्ध करून द्यावीत व समितीस योग्य ते सहकार्य करावे.

तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर **AFFILIATION → AFFILIATION T-2 INFORMATION/LISTS→ LIC REPORTS FORMATS** या लिंकवर **LIC Format - A** व **LIC Format - C** या अहवालांच्या नमुन्याची प्रत स्थानिक चौकशी समितीस उपलब्ध करून द्यावी.

**२. प्रवास भत्ते बील विभाग.**